शातंनिखा/थेट व्दितीय वर्ष/शाखा बदल/२०२१/1552,
दिनांक : ०६/०९/२०२१.

# शाखा बदल ईच्छुक विद्यार्थ्यांना सूचना

शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदलासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर बदलासाठी प्रमुख पात्रता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | वर्ष | विनंती | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | दुसरे वर्ष | अभियांत्रिकी पदविका पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदल | प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयांपैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम/पाळी/संस्था बदलीस विनंती केलेल्या शाखेत संबंधित संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता |
| २ | तिसरे वर्ष | संस्था बदल | प्रथम वर्ष उत्तीर्ण, द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये तृतीय व चतुर्थ सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयांपैकी एका विषयात अनुत्तीर्ण, संस्था बदलीस विनंती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता |

वरील पात्रता पूर्ण करत असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज खालील नमूद केलेल्या कागद पत्रांसह दिनांक १२/०९/२०२१ संध्याकाळी ०५:०० वाजे पर्यंत कार्यालयात किंवा gpolykhamgaon@gmail.com या E-mail ID वर मा. प्राचार्य यांच्या नावाने अर्ज सादर करावा. अर्ज सोबत लागणारी कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.

क) संस्था बदलीचा अर्ज (सोबत जोडलेल्या नमुन्यात).
ख) सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र.
ग) बदलीने प्रवेश देणाऱ्या सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र.
घ) ज्या वर्षासाठी (दुसरे, तिसरे) संस्था बदलासाठी विनंती केली आहे, त्या वर्षापूर्वीच्या सर्व वर्गांच्या / सत्रांच्या गुणपत्रिका.
ड) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे पात्रता प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार).
च) शिक्षणात खंड असल्यास ज्या शैक्षणिक संस्थेतील शैक्षणिक खंड आहे त्या संस्थेच्या प्राचार्यांनी दिलेले खंड प्रमाणपत्र (Gap Cerificate) किंवा रू. १००/- च्या Stamp Paper वर शिक्षणातील खंडाबाबत प्रतिज्ञापत्र.
छ) प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्ष प्रवेशाचे अलॉटमेण्ट लेटर (उपलब्ध असल्यास).
ज) संस्था बदल करण्यासाठीचे कारण या पृष्ठयर्थ पुरावे.

06/09/21

(डॉ. एस.एस. प्रभुणे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन खामगाव.

प्रत : सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
( स्थापत्य / यंत्र / विद्युत / अणुविद्युत / संगणक / GPK वेबसाईट वर टाकण्याकारीता).